# पुणे अभियंता संस्था 2001-2003

1920 मध्ये कोलकता येथे दी इंस्टिट्यूशन ऑफ इंजीनिअर्स (इंडिआ) ही मान्यवर संस्था स्थापन झाली. तिचे काही राज्यनिहाय सेंटर आहेत (जसे महाराष्ट्रात मुंबई येथे) व प्रत्येक राज्यात काही शहरात स्थानिक सेंटर आहेत. plc.iei@gmail.com असा ईमेल पत्ता असलेल्या इंस्टिट्यूशन ऑफ इंजीनिअर्स (इंडिआ) पुणे लोकल सेंटरचा अल्प परिचय येथे दिला आहे. पुणे अभियंतासंस्था असा यापुढे तिचा उल्लेख केला आहे. ही संस्था दीर्घकाल उपयुक्त कार्य करित आहे. तिची इमारत जंगलीमहाराज रस्ता, शिवाजीनगर पुणे 411005 येथे आहे (फोन 25533376). जागा अपुरी पडत असल्याने इमारतीचा विस्तार करण्याची पावले पडत आहेत. कित्येक उत्साही, ध्येयवादी व्यक्तींच्या कार्यामुळे संस्था मोठी झाली व होणार आहे. व्यक्तीगत नावांची यादी प्रदीर्घ होईल म्हणून येथे नामोल्लेख केले नाहीत. खरे तर हा आढावा कित्येक वर्षांचा घेतला पाहिजे. तथापि येथे बहुचर्चित अशा एकविसाव्या शतकातील पहिली तीन वर्षे (2001-03) विचारात घेतली आहेत.

अभियांत्रिकीच्या विविध शाखा आहेत. (उदा सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, केमिकल, संदेशवहन, माहितीतंत्र इत्यादी) व त्यांच्या वेगळ्या संस्थाही आहेत. पण पुणे अभियंतासंस्था ही सर्व शाखांची समावेशक आणखी ज्येष्ठ मान्यवर संस्था आहे. ती धर्मादाय संस्था नसून एक व्यावसायिक संस्था असल्याने तिला सरकारी अनुदाने मिळत नाहीत. संस्थेचे महत्त्व शासनमान्य असल्याने तिला मिळणाऱ्या देणग्यांबाबत काही सवलत देणगीदारांना मिळते. देणग्या, वर्गण्या, जाहीरातींचे उत्पन्न, परीक्षा-अभ्यासक्रम यांची फी असे विविध उत्पन्न संस्थेकडे येत असते. थोडे कर्मचारी आहेत, पण कार्यकर्ते विनामूल्य कामे करतात. चोख हिशेब ठेवणे, निवडणूका व्यवस्थित करणे, निष्पक्ष स्पर्धा ठेवणे, लोकशाही रीतीने चर्चा व एकोप्याने निर्णय घेणे, सभासदांशी संपर्क ठेवणे ही कामे ठीक केली जातात. अभियांत्रिकीबाबत चमकदार सातत्यपूर्ण कार्ये आणि उत्तम व्यवस्थापन यांमुळे या संस्थेला बेस्ट सेंटर कप दोनदा मिळाला. आता अभियांत्रिकी विषयक काही निवडक कार्ये पाहूया.

**भूकंप समस्या** - 26 जानेवारी 2001 रोजी गुजरात येथे भीषण भूकंप झाला. तेथील प्रचंड हानीमुळे भूकंपविरोधी इमारती कशा कराव्यात याबद्दल समाजात चर्चा सुरू झाल्या. याबाबत तज्ञांचा परिसंवाद घडवून आणणे, काही काळ अभ्यासगट चालवणे, जनतेत काही जागृती करणे, शासन व पुणे महापालिका यांना काही उपयुक्त सूचना पाठवणे असे पुणे अभियंतासंस्थेचे योगदान आहे.

**महिला अभियंत्यांचा मेळावा** - भारतात अभूतपूर्व असा हा पहिला मेळावा 28 ऑक्टोबर 2001 रोजी पुणे अभियंतासंस्थेने भरवला. देशातील सुमारे तीनशे महिला अभियंता उपस्थित होत्या. विविध शोधनिबंध असलेली स्मरणिका प्रसिद्ध केली. काही मान्यवरांचा सन्मान केला गेला. ज्ञान व कर्तृत्व यात महिलानी चांगली छाप पाडली आहे व महिलांबाबत पूर्वीचे नावीन्य आता राहिले नाही. तरीही पुरुषप्रधान संस्कृतीत कित्येक महिलांना दुय्यमता मिळते असा सुर प्रकट झाला.

**समाजाभिमुखता** - पुणे अभियंतासंस्थेचे एक वैशिष्ट्य म्हणजे अन्य कुणाही सेंटरच्या अगोदर स्थानिक भाषेत (पुण्यामध्ये मराठी भाषेत) अभियांत्रिकी विषयांबाबत जनतेसाठी माहितीपूर्ण भाषणांचा उपक्रम. हे काम जानेवारी 2002 पासून दरमहा नियमितपणे होत असते व त्यात मराठी विज्ञान परिषदेचाही सहभाग असतो. उदा. शहरी कचऱ्याची विल्हेवाट कशी करावी, नीट रस्ते कसे बांधावेत, आगीचे निवारण कसे करावे, इमारती कशा दुरुस्त कराव्यात, ध्वनीप्रदूषण, शहरे कशी सुशोभित करता येतील, उत्तम वीटा कशा कराव्यात असे नाना विषय तज्ञांमार्फत हाताळले जातात.

**गुणवंतांचा सत्कार** - काही गुणवंत अभियंत्यांच्या नावे वेळोवेळी स्मारक व्याख्याने आयोजित होतात. विविध क्षेत्रात उत्तम कार्य करणाऱ्यांचा गौरव केला जातो. उदा 4 ऑगस्ट 2002 रोजी 85 वयाच्या बी. जी. शिर्के यांचा सन्मान करण्यात आला व माहितीपूर्ण स्मरणिका प्रसिद्ध केली. बांधकाम क्षेत्रातली सदोष निविदापद्धती सुधारणे, रेडीमिक्स कॉन्क्रीटचा प्रसार इत्यादी त्यांची कामगिरी आहे.

**नदीजोड प्रकल्प** - 2003 मध्ये राष्ट्रीय पातळीवरील व कित्येक वर्षे चालणाऱ्या प्रकल्प बांधणीस चालना मिळाली. भारतातील काही नद्यांना जोडणे व अतिरिक्त पाणी गरजू प्रदेशाकडे वळवणे असे हे प्रचंड काम शासनातर्फे होईल. विविध सर्वेक्षणे व माहिती शासनाकडे आहेत. तरीही शक्य तितकी माहिती मिळवणे, विविध शंकांबाबत चर्चा ठेवणे, काही सूचना करणे यांसाठी एक अभ्यासगट निर्माण करण्यात आला. प्रकल्पाबाबत एक जाहीर चर्चासत्र 20 जून 2003 रोजी झाले.

**मार्गदर्शन** - अभियांत्रिकी शाखांची व करियरची माहिती युवकांना देणे, काही अभ्यासक्रम चालवणे, काही स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शनवर्ग चालवणे ही कार्ये होतात. तंत्रज्ञान वेगाने बदलत असते. व्यावसायिक अभियंते कॉलेजमध्ये जात नसल्याने त्यांच्यासाठी काही खास रिफ्रेशरवर्ग घेतले.

**सभासद संपर्क** - कोलकत्याच्या प्रधान संस्थेतर्फे देशातील हजारो अभियंता सभासदांना माहितीपूर्ण नियतकालिके जात असतात. त्याखेरीज पुणे अभियंतासंस्था तिच्या सुमारे अडीच हजार सभासदांना दरमहा एक वार्तापत्र पाठवते. वार्षिक अहवाल पाठवला जातो. सुमारे दोन हजार ईमेलधारकांचा याहूसमूह तयार करून वेळोवेळी संदेश जातात. काही स्नेहभोजन समारंभही होतात.

**संकीर्ण** - संस्थेची वेबसाईट आहे. एक चांगले ग्रंथालय व वाचनकक्ष आहे. तीन सभागृहे आहेत. वर्षभर इमारतीत काही ना काही कार्ये चालूच असतात. वार्षिक अभियंतादिन साजरा होतो. ऊर्जा अभासगट व अन्यही अभ्यासगट कामे करतात. कधीकधी अभियांत्रिकीवस्तुंची प्रदर्शने होतात.

-- **म. ना. गोगटे** www.mngogate.com मधील लेख M13 लेखकसंपर्क वेबसाईट इंडेक्सपानावर लेख प्रसिद्धी 1मार्च 2004 (मराठी विज्ञान परिषद पत्रिका, अभियंतामित्र). *टीप - मूळ लेखातला इंस्टिट्यूशनचा ईमेलपत्ता बदलला, नोंद केली 1 जून 2007.*